ePaper

## ...तर धनंजय मुंडेंना सहआरोपी करा, लक्ष्मण हाके स्पष्टच बोलले




| वर्ष - 8 । अंक - 229 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 6 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### आतील पानांत


- भारताचा ऑस्ट्रेलियावर विजय!
- विजयाचा पाकिस्तानला धक्का
- राम मंदिरावर दहशतवादी हल्ल्याचा कट
- मियाँ, म्हणणे हा अवमान नाही


## काय चाललंय महाराष्ट्रात ? ; अमानवी अत्याचार, नृशंस हत्या !

# क्रौर्याची परिसीमा; उन्माद अन् मस्ती!

## मस्साजोग, परभणी, लातूर, जालना..आता गडचिरोली !

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**संपूर्ण महाराष्ट्रात ठिकठिकाणी घडत असलेल्या अमानुष घटना पाहिल्या, ऐकल्या की कोणाच्याही तोंडातून सहज उद्गार बाहेर पडत आहेत.. काय चाललंय महाराष्ट्रात? क्रौर्याची परिसीमा, अमानवी अत्याचार, नृशंस हत्या दिवसाढवळ्या घडत आहेत. त्यापेक्षा बिकट परिस्थिती आहे ती म्हणजे हत्या केल्यानंतर मृतदेहावरही लचके तोडण्याची होत असलेले दुष्कृत्य.. मृतदेहाची विटंबना !**



### एकापाठोपाठ एक दुर्दैवी घटना

एका घटनेमुळे तापलेले वातावरण थंड होण्यापूर्वीच नवीन एखादी घटना पुढे येत आहे आणि त्यावरून पुन्हा राजकारणी आणि पोलिसांची लक्तरे वेशीवर टांगली जात आहेत. विधिमंडळाच्या अधिवेशनात तर विकासावर चर्चा होण्याऐवजी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये वार - पलटवारच जास्त होत आहेत, हे महाराष्ट्राचे दुर्दैवच म्हणावे लागेल .

### डूक, पंगा खुन्नस..

सर्वत्र होणाऱ्या हत्या या कोणत्या तरी मुद्द्यावर मनात धरलेला 'डूक', एखाद्यानं घेतलेला पंगा किंवा तरुणांमधील शब्द 'खुन्नस' यामुळे होत आहेत आणि पोलीस खाते हैराण झाले आहे. काही हत्यांमागे किंवा अत्याचारामागे तर अगदी किरकोळ कारणे स्पष्ट होत आहेत.

मस्साजोगमधील संतोष देशमुखची हत्या असो, नाहीतर परभणीमधील सोमनाथ सूर्यवंशी.. यामुळे अवघा महाराष्ट्र हादरला आहे, पेटला आहे. आरोपी पकडण्यासाठी किंवा त्यांना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी ठिकठिकाणी आंदोलने होताना दिसत आहेत. यातूनच मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला गेला आहे. या पाठोपाठ लातूर जिल्ह्यातील माऊली सोट याची हत्या हुरहूर लावून गेली आहे, तर जालना जिल्ह्यातील कैलास बोऱ्हाडे याच्यावर झालेले अमानुष अत्याचार आणि त्याचे गांभीर्य समजेपर्यंत गडचिरोली येथे तरुणीला फरपटत नेऊन झालेली मारहाण आणि अत्याचार हे वृत्त येऊन थडकले आहे.

### आपल्याला कोण काय करते?

या सर्व घटनांचे वर्णन करायचे झाले तर संबंधित खुनी आणि अत्याचारी यांच्यात असलेली मस्ती, माज, उन्माद आणि त्यांची खुमखुमी दिसून येते. 'आपल्याला कोण काय करते?' असे म्हणत हे अमानवी पशुसमान युवक बिनधास्तपणे समाजात वावरत आहेत.

### आणखी काही घटना उघडकीस

मस्साजोग आणि परभणी पाठोपाठ लातूर जिल्ह्यात माऊली सोट या तरुणाची अमानुष हत्या झाली. त्यानंतर लगेच जालना जिल्ह्यात कैलास बोऱ्हाडे या धनगर व्यक्तीवर

### अमानवी अत्याचार

गडचिरोलीतील अगदी ताजी घटना. गडचिरोलीमध्ये तरुणीला एकाने आधी फरफटत नेले, तिच्या डोक्यावर आणि छातीवर मारहाण करून अत्याचार केले आणि बेशुद्धावस्थेत तिला टाकून आरोपी पळून गेला. सर्व घटनांमध्ये क्रूरतेचा कळस गाठला गेला आहे.

गडचिरोली जिल्ह्यात शिवनी येथे दि. 2 मार्च रोजी रात्री ही घटना घडली, आणि दि. 4 मार्चला आरोपीला गजाआड करण्यात आले, त्याच्या मुसक्या आवळण्यात आल्या. प्रचंड घाबरलेल्या या तरुणीवर नागपूर मध्ये उपचार सुरू आहेत.

### फडणवीस यांची कसोटी



राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्यावर फार मोठी जबाबदारी आली असून त्यांच्या बुद्धीचातुर्याची, कौशल्याची, प्रशासनाची कसोटीच लागली आहे.

### कठोर भूमिका

“ महाराष्ट्रामध्ये अत्याचार आणि खुनाच्या घटना या अत्यंत दुर्दैवी आहेत. सर्वत्र पोलिसांना आणि सुरक्षा यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गुन्हेगार मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा असो, त्याला कठोरात कठोर शासन व्हावे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्रातील युवती आणि महिला सुरक्षित राहाव्यात, यासाठी सरकार आणि गृहखाते सतर्क आहे. अनेक ठिकाणी, विशेषतः संवेदनशील ठिकाणी गस्त वाढवण्यात आली आहे. मुलींनी छेडछाडीची तक्रार केली तरी त्वरित कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**- देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री.

## सरपंच संतोष देशमुख खून प्रकरण

# आरोपींच्या फोटोंना जोडे मारो आंदोलन!

### संतोष देशमुख यांच्या मारेकरांना शिक्षा झालीच पाहीजे; देण्यात आल्या घोषणा

। शिरुर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील आरोपींवर कारवाई करावी त्याच बरोबर या प्रकरणातील आकावर ही कारवाई करावी अशी मागणी करीत संतोष देशमुख यांच्या मारेकरांच्या फोटोला जोडे मारो आंदोलन शिरुर येथे करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय च्या घोषणा बरोबर , सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकरांना शिक्षा झालीच पाहीजे अश्या ही घोषणा देण्यात आल्या.**



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या अंत्यत निर्घूणपणे व अमानुषपणे करण्यात आली असून या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करावी. जलद न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी व्हावी . कोणाच्या दबावाला बळी न पडता शासनाने या प्रकरणी कारवाई करावी अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

हॉटेल आस्वाद जवळ हे आंदोलन करण्यात आले . यावेळी आखिल भारतीय मराठा महासंघाचे श्यामकांत वर्पे , महिला आघाडी तालुकाध्यक्ष अर्चना डफळ , संघटक आशा ढवण , माजी अध्यक्षा शशिकला काळे , जनता दलाचे संजय बारवकर , समस्त मराठा समाज संघचे विश्वस्त व माजी उपसरपंच संभाजीराव कर्डिले, रामभाउ इंगळे , संजय माशेरे , महेंद्र ढेरे , अखिल भारतीय मराठा महासंघ युवा आघाडीचे राहुल शिंदे , शिरुर विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष आप्पा वर्पे , मुकेश पाचर्णे , भरत ढाके , संतोष झांबर , पकंजराव जाधव आदी यावेळी उपस्थित होते

---

## “ऐकमेकांना वेळ द्या, एकमेकांना भेटा!

### एकमेकांशी बोला, नाती जपा”, प्रसिध्द व्याख्याते गणेश शिंदे यांचे आवाहन

। शिरुर । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**आम्ही आमच्यात इतके गुरफटलो आहे की समाज, नातीगोती सहवास, सगळे विसरलो आहे .ऐकमेकांना वेळ द्या, एकमेकांना भेटा, एकमेकांशी बोला .नाती जपा असे आवाहन प्रसिध्द व्याख्याते गणेश शिंदे यांनी केले.**

आम्ही आमच्यात इतके गुरफटलो आहे की समाज ,नातीगोती सहवास, सगळे विसरलो आहे .ऐकमेकांना वेळ द्या, एकमेकांना भेटा, एकमेकांशी बोला .नाती जपा असे आवाहन प्रसिध्द व्याख्याते गणेश शिंदे यांनी केले . शिरुर येथील कटारिया कलेक्शनचे प्रमुख सुरेश कटारिया यांचे नूकतेच निधन झाले . त्यानिमित्त आयोजित श्रध्दांजली सभेत शिंदे बोलत होते .

यावेळी शिंदे म्हणाले की आज काळ लोकांना श्वास घ्यायला व लोकांच्या सुख दु:खात जायला वेळ नाही. लोकांना बोलायला वेळ नाही .मोबाईल मुळे माणस अस्वस्थ झाली आहेत. मोबाईल आपल्यासाठी आहे का मोबाईलसाठी आपण आहे असा प्रश्न विचारुन अस्वस्थ राहू नका . ऐकमेकांना वेळ द्या एकमेकांना भेटा एकमेकांशी बोला असे शिंदे म्हणाले .

आम्ही आमच्यात इतके गुरफटलो आहे की समाज ,नाती गोती, सहवास सगळे विसरलो आहे. .आपल्या आई वडिलांशी बोला जवळची नाती सांभाळा . आपण यंत्र नाही माणूस आहे हे कधी विसरु नका .आयुष्य हे क्षणभंगुर आहे .इतरांच्या तुलनेत जगू नका . आपणांस आपल्या जगण्याचे कौतुक वाटु द्या .आपल्या आई वडिलांविषयी कृतज्ञ असले पाहीजे .असे ही ते म्हणाले सुरेश कटारिया यांनी उत्तम व्यवसाया बरोबर मैत्र ही जमविले आनंदी पणाने ते जीवन जगल्याचे शिंदे म्हणाले .

यावेळी महेश सुरेश कटारिया यांच्या परिवाराचा वतीने सुरेश कटारिया यांच्या जीवनाचा आढावा घेणारी चित्रफीत दाखवली . धनराज कटारिया , रमणलाल कटारिया , विलास कटारिया , संतोष कटारिया , महेश कटारिया , नीलेश कटारिया , पवन कटारिया , ज्ञानगंगा विश्व विद्यालयचे प्रमुख डॉ . राजेराम घावटे ,सुनील घावटे , सुवालाल पोखरणा , नवनाथ फरगडे आदी उपस्थित होते .

# पिंपरी चिंचवड मध्ये तीन दिवसात 35 हजार बालकांचे जेई लसीकरण पूर्ण!

## शहरात जेई लसीकरण मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद!

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरी आणि ग्रामीण संस्कृतीने नटलेल्या चार दिवसीय पवनाथडी जत्रेचा सोमवारी समारोप झाला. या जत्रेस नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. यावर्षी सुमारे ४ ते ५ लाख लोकांनी पवनाथडी जत्रेस भेट देऊन विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला, वस्तू खरेदी केल्या आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना हजेरी लावली. तसेच सर्व सहभागी बचत गटांची सुमारे १.५ ते १.२५ कोटी रुपयांची उलाढाल या पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून झाली, अशी माहिती समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी दिली.**



सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड पालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे जापनीज मेंदूज्वर (जेई) प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. १ ते १५ वयोगटातील बालकांसाठी १ मार्च पासून सुरू झालेल्या या मोहिमेंतर्गत अवघ्या तीन दिवसांत ३५ हजारांहून अधिक मुलांचे लसीकरण यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले आहे.

राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत ही मोहीम शाळा, अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि विशेष लसीकरण शिबिरांमध्ये प्रभावीपणे राबविली जात आहे. शहरातील सर्व मुलांचे शालेय व समाजस्तरावर मोफत लसीकरण केले जात आहे. पालक या मोहिमेस मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देत आहेत. संपूर्ण शहरात राबवण्यात येत असलेल्या या मोहिमेत ४ मार्च पर्यंत ३५ हजारांहून अधिक बालकांचे जेई लसीकरण करण्यात आले आहे.

### लसीकरणासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद

| | |
|---|---|
| आकुर्डी रुग्णालय | - ६ हजार २८९, |
| भोसरी रुग्णालय | - ५ हजार ३०४ , |
| जिजामाता रुग्णालय | - ३ हजार २३६, |
| सांगवी रुग्णालय | - ४ हजार ५३०, |
| तालेरा रुग्णालय | - ४ हजार ७२४, |
| थेरगाव रुग्णालय | - २ हजार८०६, |
| यमुनानगर रुग्णालय | - ५ हजार ७७८ |

**यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय - २ हजार ३६३ बालकांचे लसीकरण करण्यात आले आहे.**

"'जेई' प्रतिबंधक लसीकरण मोहीम केवळ एक लसीकरण उपक्रम नसून आपल्या मुलांच्या उज्वल आणि आरोग्यदायी भविष्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक बालकाला लसीकरण मिळावे, यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाने नियोजन केले आहे. पालकांनी देखील या मोहिमेस सहकार्य करून आपल्या पाल्यांचे जीवन सुरक्षित करण्यासाठी या उपक्रमात सक्रीय सहभाग घ्यावा. या मोहिमे अंतर्गत शहरातील सर्व मुलांचे शालेयस्तरावर मोफत लसीकरण केले जात आहे. तरी जास्तीतजास्त नागरिकांनी आपल्या घरातील १ ते १५ वयोगटातील पाल्याला ही लस देऊन घ्यावी.

**–शेखर सिंह,**
आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी- चिंचवड महापालिका

---

# सक्षमा प्रकल्पातील महिला बचत गटांसाठी मार्गदर्शन मेळावा

## रोजगार उपलब्ध करून देण्याचा महापालिकेचा मानस : अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सक्षमा प्रकल्पाअंतर्गत शहरातील सक्रीय महिला बचत गटांना प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात येत आहे. याशिवाय त्यांना मालमत्ता कर संकलन, नवी दिशा, अग्नि सुरक्षा सर्वेक्षण यांसारख्या महापालिकेच्या विविध उपक्रमात सहभागी करून घेऊन रोजगार उपलब्ध करून देण्याचा महापालिकेचा मानस आहे. तसेच बचत गट मॉल यांसारख्या संकल्पना राबवून त्यांना कायमस्वरूपी स्वतःचा हक्काचा व्यवसाय सुरू करून देणे हा यामागचा उद्देश आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि टाटा कम्युनिटी इनिशिएटिव्हस ट्रस्ट (टाटा स्ट्राइव्ह) यांच्या संयुक्त विद्यमाने महिला बचत गटांसाठी सक्षमा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पात सहभागी महिला बचत गटांसाठी महिला दिनाचे औचित्य साधून पिंपरी कॉलनी येथे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाजवळील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे महिला मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी नगरसदस्या सुजाता पालांडे, उषा मुंडे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, प्रशासन अधिकारी पुजा दूधनाळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, टाटा स्ट्राईव्हचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमेय वंजारी, टाटा मोटर्स गृहिणी प्रकल्प अध्यक्षा शिल्पा देसाई, सीएसआर प्रमुख अमिता जाधव, सल्लागार अनिता राजन तसेच महापालिका कर्मचारी आणि सक्षमा प्रकल्पातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील म्हणाले, शहरामध्ये सध्या १५ हजारांपेक्षा जास्त महिला बचत गट आहेत. त्यामधील सुमारे ४ हजार ५०० महिला बचत गट सक्रीय आहेत. या महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महापालिकेने टाटा स्ट्राईव्हसोबत करार केला आहे. या कराराअंतर्गत सक्षमा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात आहे. याशिवाय या प्रकल्पामध्ये अधिकाधिक महिला बचत गटांना सामिल करून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. महिला बचत गट ठराविक पातळीच्या क्षमतेच्या पलीकडे जात नाहीत. त्यांना आधुनिक जगाशी स्पर्धा करायची असेल तर आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान त्यांना असणे आवश्यक आहे. व्यावसायिक क्षेत्रात सध्या मोठ्या प्रमाणावर स्पर्धा आहे. या स्पर्धेच्या युगात स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करायचे असेल तर उत्पादनांची गुणवत्ता टिकवून ठेवणे गरजेचे आहे. उत्पादनांची गुणवत्ता टिकवून ठेवायची असेल तर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर महत्वाचा आहे. या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण तसेच महिलांना व्यावहारिक व आर्थिक ज्ञान देण्यासाठी सक्षमा प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे.

### महिला बचत गटांनी या प्रकल्पाचा लाभ घ्यावा

प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी विविध बड्या कंपन्यांसोबत भागीदारी करण्यासाठी देखील महापालिका सहकार्य करणार आहे. याशिवाय येत्या काही दिवसात महापालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणारे बॅग, वह्या, रेनकोट आदी साहित्य बनविण्याचे काम या महिला बचत गटांना देण्याचा महापालिकेचा मानस आहे. यासाठी महिला बचत गटांनी साहित्याची गुणवत्ता टिकवून ठेवणे गरजेचे आहे. यासाठी सक्षमा प्रकल्प महत्वाचा असून जास्तीत जास्त महिला बचत गटांनी या प्रकल्पाचा लाभ घ्यावा, असे आवाहन देखील प्रदीप जांभळे पाटील यांनी यावेळी केले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### भगवंताचे नाम कधी सोडू नये

जगामध्ये सर्वस्वी खरे असे अस्तित्व एकच असले पाहिजे; त्यालाच आपण 'भगवंत' असे म्हणतो. भगवंत हा अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे मनुष्याचा विचार त्याच्यापर्यंत पोहोचू शकत नाही. मानवी विचार हा शब्दमय आहे; म्हणून विचाराच्या भूमिकेवर उभे राहून भगवंताची कल्पना करायला शब्द हेच साधन आहे. याला 'नाम' असे संत म्हणतात. ज्या अंत:करणात नाम आहे, म्हणजे ज्या अंत:करणामध्ये भगवंताबद्दल प्रेम, आस्तिक्यबुद्धी, भाव, श्रद्धा आहे तिथे भगवंत विशेष प्रकट झालेला दिसून येतो. भगवंताबद्दल आस्तिक्यबुद्धी असणे म्हणजे स्वत:बद्दल नास्तिक्यबुद्धी असणे होय. एका म्यानात ज्याप्रमाणे दोन तलवारी राहू शकत नाहीत, त्याप्रमाणे भगवंत आणि अहंपणा एका अंत:करणात राहू शकत नाहीत. संत हे भगवंताशी एकरूपच झालेले असतात. भगवंताचे नाम घेणे म्हणजे आपल्या कर्तेपणाचा अभिमान कमी करणे होय. नामाचे प्रेम लागले म्हणजे कर्तेपणाचा अभिमान कमी होतो. कर्तेपणा भगवंताकडे सोपविल्यावर आपली स्वत:ची इच्छा राहातच नाही. जिथे इच्छा नाही तिथे यशापयशाचे महत्त्व उरत नाही. कधी सुख तर कधी दु:ख, कधी यश तर कधी अपयश, हा प्रपंचाचा धर्मच आहे हे ओळखून, आपल्या आयुष्यात घडणाऱ्या सर्व घटना 'त्याच्या' इच्छेने आणि सत्तेने घडून येतात अशी जाणीव ज्याच्या अंत:करणात उमटली त्याला भगवंताचे अस्तित्व खरे समजले. 'मी खरा नसून तोच खरा आहे' हे सांगण्यासाठी जिथे 'मी'च उरत नाही, ती खरी पूर्णावस्था होय. तिथे 'मी त्याला जाणतो' हे देखील संभवत नाही. संत ओळखू यायला आणि त्याची भेट घडायला, भगवंताचे नामच घेत राहणे आवश्यक आहे. नाम घेत असताना, सदाचरण कधी सोडू नये, नीतीच्या मर्यादा कधी ओलांडू नयेत, निराश कधी बनू नये, देहाला उगीच कष्टवू नये; पण काही झाले तरी भगवंताचे नाम कधी सोडू नये. कर्तव्याचे फळ प्रारब्धाधीन असल्याने, जे फळ मिळेल त्यात समाधान मानावे; किंबहुना, भगवंताच्या सत्तेने सर्व सूत्रे हलतात, म्हणून प्रारब्धदेखील त्याच्या नजरेखाली काम करते. नाम घेणे म्हणजे सर्वस्व देणेच होय. मोठा अधिकारी आपल्या सहीचा शिक्का करतो; तो ज्याच्या हातामध्ये असतो तो मनुष्य त्या शिक्क्याने साहेबाइतकेच काम करवून घेऊ शकतो. हे जसे व्यवहारामध्ये आहे, अगदी तसेच भगवंताच्या बाबतीतही आहे. जे काम प्रत्यक्ष भगवंत करतो तेच काम त्याचे नाम करीत असते.

**बोधवचन : भगवंताचे प्रेम एकदा चिकटले की, त्याच्या आड दुसरे काही येत नाही.**



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

# असल्या पशुसमान खुन्यांपेक्षा, लचके तोडणारी गिधाडं बरी !

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची झालेली नृशंस हत्या..त्यानंतर हत्या करतानाचे प्रसिद्ध झालेले अनेक फोटो.. हत्या करत असताना 'एन्जॉय' करणारे खुनी..जनतेमध्ये उसळलेली संतापाची लाट.. तापलेले वातावरण..आणि धनंजय मुंडे यांचा राजीनामा !**





या प्रकरणात 'सीआयडी'ने सादर केलेले आरोपपत्र.. त्यातील प्रमुख आरोपी वाल्मीक कराड.. वाल्मीक कराडचा 'गॉडफादर' धनंजय मुंडे..सगळं सगळं पाहताना, वाचताना आणि ऐकताना मेंदूचा अक्षरशः भुगा झालाय ! किती हा निर्लज्जपणा..अशा प्रकारे खून करताना खुन्यांना जरासुद्धा लाज वाटली नाही का हो? मृतदेहाचे लचके तोडणाऱ्या गिधाडांपेक्षा पेक्षा ही कृती अजिबात कमी नाही !

अखेर मुंडे यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. राजीनामा देतानाचं कारण, तब्बेत ठीक नाही, असं दिलं आहे. तर त्यांच्या पक्षाचे नेते , अध्यक्ष अजित पवार यांनी राजीनामा नैतिकतेच्या आधारावर दिला, असं सांगितलं आहे.

### मृत्यूचा सगळा खेळ मांडला..

एकीकडं दूरचित्रवाहिन्यांवर धनंजय मुंडे यांचा 'जीव की प्राण' असणारा वाल्मिक कराड आणि त्यांच्या कच्याबच्यांनी संतोष देशमुख यांच्या मृत्यूचा खेळ मांडला होता. त्याची छायाचित्रे दाखवली जात होती, ती पाहता कोणाच्याही तळपायाची आग मस्तकात जावी, असं ते प्रकरण होतं. खंडणी मागताना जे आडवे येतील, त्यांना आडवं करण्याची कराडची भाषा आणि त्याप्रमाणं वागणारे त्याचे बगलबच्चे हे मानवजातीला अक्षरशः कलंक आहेत. त्यांचं कृत्य मानवतेला काळिमा फासणारे आहे आणि ते पाहून समाधान मानणारे वाल्मिक कराड आणि कंपनी माणुसकीचे मारेकरी आहेत, हे अत्यंत क्लेशदायक आहे.

### धनंजय मुंडे यांची भूमिका..

त्यांना कायद्याने कठोर शिक्षा झालीच पाहिजे. मात्र, याची पाळेमुळे धनंजय मुंडे यांच्या पर्यंत पोहचत असतील तर धनंजय मुंडेही या नराधमांना दिल्या जाणाऱ्याच शिक्षेस पात्र असतील. राजकारण किती गेंड्याच्या कातडीने केले जाते आणि त्या करता राजकारणी किती लाज सोडून वागतात, हे या निमित्ताने पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे. गेले ८४ दिवस धनंजय मुंडे यांना 'महायुती' वगळता सगळे पक्ष आणि महायुती मधील भाजपचे आ. सुरेश धस राजीनामा मागत होते. मात्र, निर्ढावलेले धनंजय मुंडे आपल्या मस्तीत होते.

### फडणवीस का गप्प बसले?

खरे तर त्यांनी केलेल्या प्रकारामुळे अजित पवार यांना पण मुंडे नकोच असतील, मात्र त्यांना मंत्रिमंडळातून बाहेर व्हा, हे सांगता आले नाही. तर मुंडे हे फडणवीसांचेही जुने मित्र असल्याने त्यांचीही जीभ राजीनाम्यासाठी रेटली नाही. आता जनमताचा दबाव एवढा वाढला की राजीनाम्याचा आदेश दिल्याशिवाय फडणवीस यांना गत्यंतर राहिले नाही. सरकार म्हणून जी यंत्रणा आहे, ती तुमच्या सोबत नाही हे दाखवून द्यावे लागले.

### कराडची तुरुंगात बडदास्त..

अजूनही वाल्मिक कराडला तुरुंगात मिळणारी बडदास्त पाहता कराड आणि कंपनीचा माज संपला नाही. अत्यंत तृतीय श्रेणीतले हे गुंड आहेत. झुंडीने राहिल्याने आणि सरकारी यंत्रणा सोबत असल्याने गेली किमान दहा वर्षे हे परळीत अवैध धंद्यातून राज्य करत होते, अक्षरशः उच्छाद मांडत होते.

### प्रत्येक गावात कराड, चाटे आणि मुंडे..

प्रत्येक गावागावातील असे मुंडे, कराड, चाटे, केदार, सांगळे इत्यादी हुडकून काढले पाहिजेत. गेल्या दहा वर्षात कराड टोळीने केलेले कारनामे, मुंडेंचे प्रताप शोधले पाहिजेत. अशा किती संतोष देशमुखांवर या मंडळींनी अन्याय केला, हे शोधले पाहिजे.

### अशा नरा, मारा पैजारा..

तब्बेत बरी नाही हे राजीनाम्याचे कारण आता होऊ शकत नाही. दिसत नाही, बोलता येत नाही मात्र मंत्री होण्याची हावं सुटत नाही, असा प्रकार मुंडे यांचा झाला आहे. अशा नरा मोजुनि पैजारा मारल्या पाहिजेत. तसेच त्यांना मंत्रिमंडळात घेणाऱ्यांनाही त्याचा प्रसाद दिला पाहिजे. अजित पवार यांना मुंडेंची कारकीर्द माहीत नव्हती का? असे असताना त्यांना मंत्री करण्याचा अट्टहास का? असे म्हणायचे कारण अजित पवार यांनी अखेरपर्यंत धनंजय मुंडे यांना राजीनामा मागितला नाही. तसेच अगदी नरड्यापर्यंत येईपर्यंत देवेंद्र फडणवीस यांनीही मुंडे यांना राजीनामा देण्यास सांगितले नाही, ही बाब जास्त गंभीर आहे.

### सुप्रियाताई, आव्हाड यांची भूमिका..

विरोधी पक्षातल्या सुप्रिया सुळे, जितेंद्र आव्हाड यांना मुंडेंची कारकीर्द माहीत नव्हती का? धनंजय गुणी होते, कर्तृत्ववान होते म्हणून त्यांना शरद पवार यांनी, काका स्व.गोपीनाथ मुंडे यांच्याकडून फोडले होते ना ? राजकारणात त्यांची प्राणप्रतिष्ठा करण्याचे पुण्य पवार घराण्याचेच ना ? करमुसे यांची फोडलेली पाठ आणि स्व. देशमुख यांच्या पाठीचे फोटो आव्हाडांना तरी ओळखतील का ? सबब विरोधकांनी प्रामाणिकपणाचा न झेपणारा आव आणू नये. आता, फडणवीस यांना मुंडेंसह अजित पवार आणि राष्ट्रवादी पक्षाला ही विवस्त्र करायचे असेल असा तर्क मांडला जाईल .

### हे तर महाराष्ट्राचे दुर्दैव!

प्रत्यक्षात मुंडे, कराड यांची लायकी लक्षात आल्यावरही अजित पवार हे धनंजय मुंडे नैतिकतेच्या आधारावर राजीनामा देत आहेत, असे सांगत असतील तर ते राज्याचे दुर्दैव आहे. गेले अडीच-तीन महिने मुंडेंची ही नाजूक नैतिकता कुठे गेली होती ? राजीनाम्याचा प्रश्न निघाला की पवार चेंडू फडणवीसांकडे टोलवायचे तर फडणवीस पवारांकडे! दोघानांही मुंडेंना थेट राजीनामा मागण्याचे धाडस का झाले नाही ? विधान सभेत आ. सुरेश धस यांनी स्व. देशमुख यांना कसे मारले, याचे वर्णन केले . त्यावेळी पवार-फडणवीस यांच्या हृदयाला पाझर का फुटला नाही? एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री आणि सरकारमध्येच आहेत त्यांनी यावर भाष्य का केले नाही ?

### मुंडे यांचा नैतिकतेचा आव

मुळात ज्या मंत्र्याला आजारामुळे दोन मिनिटापेक्षा जास्त वेळ बोलता येत नाही, त्याला मंत्री का करावे? आणि त्यानेही निर्लज्जपणे प्रकरण अंगाशी आले की आजाराचे कारण देत मैदान का सोडवे? ज्या धनंजय मुंडे यांचे दोन विवाह झालेत, अनैतिक संबंध आहेत, दोन पेक्षा अधिक मुले आहेत, कराड सारख्या कुख्यात गुंडांशी घनिष्ट संबंध आहेत, अंबाजोगाई येथील राख विक्रीसारख्या प्रकरणात कराडचा हात आहे, हे अनेकजण वारंवार सांगत होते. अशाशी घनिष्ट सबंध असणाऱ्या धनंजय मुंडे यांच्याकडून नैतिक राजीनाम्याची अपेक्षा कोणी केली नव्हती, तर त्यांच्या हकालपट्टीची आवश्यकता होती. या खूनप्रकरणात ज्या पद्धतीने फासे पडले, ते अत्यंत दुर्दैवी आहे आणि त्याला कराड,मुंडे यांच्याप्रमाणे अजितदादा आणि मुख्यमंत्री फडणवीस यांना जबाबदार धरायचे नाही का ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


## उद्धव ठाकरेंवर घणाघाती टीका, आरोप

# विधानसभेत खडाजंगी!

### कलगीतुरा आणि आरोप-प्रत्यारोपांनी गाजला दिवस

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा तिसरा दिवस कलगीतुरा आणि आरोप-प्रत्यारोपांनी गाजला. विधानसभेत मंत्री गुलाबराव पाटील आणि शिवसेना उबाठाचे आमदार आदित्य ठाकरेंची खडाजंगी पाहायला मिळाली. यानंतर भाजप आमदार राम कदम आणि विरोधी पक्षनेते भास्कर जाधव यांच्यात वाकयुद्ध रंगलं. कदम यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर घणाघाती टीका करत आरोप केले.**



त्या सगळ्या आरोपांना जाधव यांनी प्रत्युत्तर दिलं. सभागृहाचे सदस्य राम कदम यांनी काही आक्षेपार्ह विधानं केली. त्यावेळी मी पॉईंट ऑफ ऑर्डर उपस्थित केला होता. आपण मला पॉईंट ऑफ ऑर्डर उपस्थित करण्याची संधी दिली नाही. त्याचवेळेला अध्यक्ष महोदय मी आपल्याकडून हमी घेतलीय की जेव्हा मी भाषण करेन तेव्हा तुम्ही मला पूर्ण संरक्षण द्याल. यांचं भाषण जसं आम्ही ऐकलं तसं आमचं भाषणदेखील यांनी ऐकावं. मी घसा फोडून सांगत होतो. पण अध्यक्ष महोदयांनी दुर्लक्ष केलं. विरोधक संख्येनं कमी आहेत. पण लोकशाहीची शान म्हणून त्यांनाही महत्त्व असायला हवं, असं जाधव म्हणाले. सभागृहाचे सदस्य राम कदम यांनी माजी मुख्यमंत्री सन्माननीय उद्धव ठाकरेंचं वारंवार नाव घेतलं. वारंवार वाटेल ते आरोप केले. काय करावं काय आम्ही? तुमच्या समोर डोकं फोडावं का? मी तुम्हाला सांगत होतो पॉईंट ऑफ ऑर्डर. पण पॉईंट ऑफ ऑर्डर उपस्थित करुच दिला नाही. ज्या माणसाला, ज्या व्यक्तीला, या सभागृहात येऊन आपल्यावर झालेल्या आरोपांचा खुलासा करता येत नाही, त्याचा नामोल्लेख या सभागृहात होता कामा नये. हा नियम आहे की नाही? ही प्रथा आहे की नाही? हे पावित्र्य पाळलं गेलंय का?, अशी प्रश्नांची सरबत्तीच कदम यांनी केली. भास्कर जाधव बोलत असताना राम कदम यांनी मध्येच प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. तेव्हा जाधव यांनी अध्यक्ष महोदयांकडे यांना गप्प राहायला सांगा, अशी विनंती केली. मात्र तरीही कदम बोलत होते. तेव्हा जाधव यांचा पारा चढला. बघतोच तुला आता म्हणत त्यांनी राम कदमांना इशाराच दिला. यांचे आरोप सुरु असताना मी गप्प होतो. नव्या सदस्यांना मला एक विनंतीवजा सूचना करायची आहे. कधी कधी आपण आपल्या नेत्यांची इतकी चापुलसी, हाजी हाजी करतो, इतकं टोकाचं बोलतो. कदाचित आपल्याला वाटत असेल अशा विधानांनी आपले नेते खूष होतील. पण आपण कळत नकळत त्या पक्षाची प्रतिमा खराब करतो, असं जाधव म्हणाले. महाराष्ट्र सरकारच्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी सभागृहात आदित्य ठाकरे आणि पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. मंत्र्यांनी अभ्यास करुन सभागृहात उत्तरं दिली पाहिजे असा टोला आदित्य ठाकरेंनी लगावला. ज्यावर गुलाबराव पाटील यांनीही माझा अभ्यास आहे म्हणूनच मला तुमच्या वडिलांनी खातं दिलं होतं असं उत्तर दिलं आहे. या दोघांमध्ये चांगलीच शाब्दिक टोलेबाजी पाहण्यास मिळाली.आदित्य ठाकरे म्हणाले "काहीही विचारलं तर मंत्री महोदय लगेच केंद्र सरकारकडे बोट दाखवतात. मंत्र्यांना खातं कळलं आहे की नाही हाच प्रश्न आहे.

#### शिवसेनेत 2022 ला मोठी फूट

शिवसेनेत अशी सगळी दुही आहे. त्यामुळे एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना यांच्या आमदारांमधून विस्तव जात नाही असं चित्र आहे. त्याचाच प्रत्यय आज गुलाबराव पाटील विरुद्ध आदित्य ठाकरे यांच्यातली खडाजंगी पाहताना आला. आदित्य ठाकरे यांनी जेव्हा अध्यक्षांना विनंती केली आणि मंत्र्यांनी अभ्यास करुन यावा म्हटलं तेव्हा गुलाबराव पाटील यांनीही उद्धव ठाकरेंचं नाव घेत आदित्य ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं. त्या सगळ्या आरोपांना जाधव यांनी प्रत्युत्तर दिलं. सभागृहाचे सदस्य राम कदम यांनी काही आक्षेपार्ह विधानं केली. त्यावेळी मी पॉईंट ऑफ ऑर्डर उपस्थित केला होता.

---

## उद्योजकांना पालकमंत्री विखे यांचा त्रास

### खासदार लंके यांचा आरोप, पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांना पाठवले पत्र

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सुपा औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांना वेठीस धरून पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडून नाहक त्रास देण्यात येत असल्याचा आरोप खासदार नीलेश लंके यांनी केला आहे. यासंदर्भात आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री व केंद्रीय उद्योग मंत्री पियुष गोयल यांच्याकडे तक्रार केल्याचे खासदार लंके यांनी सांगितले.**





खासदार लंके यांनी पत्रात म्हटले की, सुपा औद्योगिक वसाहत दिवसेंदिवस वाढत असून नवनवीन उद्योग येत आहेत. सध्याच्या उद्योजकांना नाहक त्रास दिला जात आहे. या त्रासामुळे या वसाहतीमध्ये नव्याने येणाऱ्या उद्योगांवर परिणाम होणार आहे आणि हे असेच सुरू राहिले तर रोजगाराच्या संधींवर त्याचा गंभीर परिणाम होईल. स्थानिक कामगार कंत्राटदारांचे परवाने कोणतेही ठोस करण न देता रद्द करण्यात आले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेले उद्योग तसेच नव्या उद्योजकांना विनाकारण चुकीच्या नोटीस पाठवून दबाव टाकण्यात येत आहे. या औद्योगिक वसाहतीत कोणत्याही प्रकारचे गौण खनिज उत्खनन अनधिकृतपणे सुरू नसतानाही पालकमंत्री महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना उद्योजकांवर चुकीच्या पध्दतीने कारवाई करण्यासाठी करण्यास भाग पाडत आहेत. उद्योजकांना जिल्हाधिकारी कार्यालयात बोलवून धमकावले जात असल्याचा गंभीर आरोप या पत्रामध्ये खा. लंके यांनी केला आहे .सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये जर असेच प्रकार सुरू राहिले तर सुरळीत असलेल्या व वाढत असलेल्या या औद्योगिक वसाहतीत भविष्यात नविन उद्योग येणार नाहीत. आहेत ते उद्योग बंद होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न अधिक तिव्र होईल. याचा गांभीर्याने विचार करून संबंधितांना योग्य ते आदेश द्यावेत अशी मागणी खा. लंके यांनी पत्राद्वारे केली आहे.सुपा औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांना वेठीस धरून पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडून नाहक त्रास देण्यात येत असल्याचा आरोप खासदार नीलेश लंके यांनी केला आहे. यासंदर्भात आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री व केंद्रीय उद्योग मंत्री पियुष गोयल यांच्याकडे तक्रार केल्याचे खासदार लंके यांनी सांगितले. खासदार लंके यांनी पत्रात म्हटले की, सुपा औद्योगिक वसाहत दिवसेंदिवस वाढत असून नवनवीन उद्योग येत आहेत.

#### नोटीस पाठवून दबाव

नव्याने येणाऱ्या उद्योगांवर परिणाम होणार आहे आणि हे असेच सुरू राहिले तर रोजगाराच्या संधींवर त्याचा गंभीर परिणाम होईल. स्थानिक कामगार कंत्राटदारांचे परवाने कोणतेही ठोस करण न देता रद्द करण्यात आले आहेत.उद्योग तसेच नव्या उद्योजकांना विनाकारण चुकीच्या नोटीस पाठवून दबाव टाकण्यात येत आहे.

# ट्रम्प यांची सर्व देशांविरोधात आक्रमक भूमिका!

## केवळ पाकिस्तानचं कौतुक, थेट संसदेतून मानले आभार

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**डोनाल्ड ट्रम्प हे दुसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यानंतर ४४ दिवसांनी म्हणजेच आज (बुधवार, ५ मार्च) त्यांनी पहिल्यांदाच अमेरिकेच्या संसदेला (अमेरिकन काँग्रेस) संबोधित केलं. संसदेच्या संयुक्त सत्राला संबोधित करताना ट्रम्प यांनी अनेक मोठ्या घोषणा केल्या. तसेच कॅनडा, युरोपियन युनियन, भारत, चीन, ब्राझील व दक्षिण कोरिया या देशांवर वेगवेगळे आरोप केले. अमेरिकेतील विद्यमान सरकारचं कौतुक करत ते म्हणाले, "अनेक सरकारांनी चार किंवा आठ वर्षांच्या कार्यकाळात जितकं काम केलं नसेल तितकं काम आमच्या सरकारने मागील ४३ दिवसांत केलं आहे, तसेच यावेळी त्यांनी अमेरिकेला पुन्हा गौरवशाली राष्ट्र बनवण्याचा, युक्रेन-रशिया युद्ध थांबवण्याचा निर्धार व्यक्त केला.**



असं म्हणत ट्रम्प यांनी देशातील महागाई कमी करण्यासंदर्भात घोषणा दिली. वाढलेल्या महागाईचं खापर त्यांनी यापूर्वीचे अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांच्या डोक्यावर फोडलं. ते म्हणाले, "अमेरिकेचे माजी अध्यक्ष जो बायडेन यांचा कारभार अमेरिकेतील महागाई वाढण्यास कारणीभूत ठरला". ट्रम्प यांनी त्यांच्या दीड तासांच्या भाषणात भारतासह अनेक देशांवरील त्यांची नाराजी व्यक्त केली. आयात शुल्कावरून (टॅरिफ) अमेरिका जगभरातील विविध देशांशी संघर्ष करत आहे. याच मुद्द्यावरून त्यांनी भारतावरील नाराजी उघड केली. या भाषणादरम्यान त्यांनी दोन वेळा भारताचा उल्लेख केला. ते म्हणाले, "भारत अमेरिकेवर १०० टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लादतो. ही चुकीची बाब आहे. आम्ही देखील आगामी २ एप्रिलपासून त्यांच्यावर आयात शुल्क लादू. इथून पुढे जो देश आमच्यावर आयात शुल्क लादेल, त्या देशावर आम्ही देखील तितकंच आयात शुल्क (RECIPROCAL TARIFF) लादू. २ एप्रिलपासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल." याच मुद्द्यावरून त्यांनी अनेक राष्ट्रांना सुनावलं. ट्रम्प यांच्या भाषणात केवळ एका देशासाठी चांगले व गोड शब्द ऐकायला मिळाले. तो देश म्हणजे पाकिस्तान.डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, अमेरिका इस्लामी कट्टरपंथी संघटना व दहशतवाद्यांविरोधात ठामपणे उभी आहे. साडेतीन वर्षांपूर्वी अमेरिकेचे लष्करी जवान अफगाणिस्तानमधील एक मोहीम संपवून परत येत असताना आयएसआयच्या दहशतवाद्यांनी काबूल विमानतळावर एक आत्मघातकी बॉम्बस्फोट घडवून आणला. यामध्ये आपले १३ जवान शहीद झाले. कित्येक नागरिक त्या हल्ल्यात मारले गेले. आपल्या देशाच्या इतिहासातील तो एक काळाकुट्ट क्षण होता. मात्र, मला सांगायला आनंद होत आहे की त्या हल्ल्याचा सूत्रधार व आयएसआयच्या दहशतवाद्याला आपण पकडलं आहे. त्याला आता आपण अमेरिकेत आणणार आहोत. त्याला आपल्या कायद्यानुसार शिक्षा सुनावली जाईल. त्या दहशतवाद्याला पकडण्यात पाकिस्तानच्या सरकारने आपली मदत केली. त्याबद्दल मी पाकिस्तानी सरकारचे आभार मानतो. त्या १३ कुटुंबांसाठी हा दिवस खूप महत्त्वाचा होता. मी त्या शहीदांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांच्या भावना समजू शकतो. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी अमेरिकन काँग्रेसच्या संयुक्त सभेला संबोधित केलं. यावेळी डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या आगामी आंतरराष्ट्रीय भूमिकेबाबत महत्त्वपूर्ण घोषणा केली. भारत, चीन, कॅनडा, दक्षिण कोरिया अशा देशांवर अमेरिकेकडून RECIPROCAL TARIFF म्हणजे सोप्या शब्दांत जशास तसे शुल्क लागू करण्याचा निर्णय जाहीर केला. येत्या २ एप्रिलपासून नवे टेरिफ दर लागू होतील, असंही त्यांनी जाहीर केलं. यावेळी आपण २ तारीखच यासाठी का निवडली, याबाबत ट्रम्प यांनी मिश्किल भाष्य केलं आहे. "आमच्या सरकारमध्ये कंपन्यांवर टेरिफ आकारलं जाईल. पण ज्या कंपन्या त्यांचं उत्पादन अमेरिकेत करणार नाहीत, त्या कंपन्यांवर जास्त शुल्क आकारलं जाईल", असं ट्रम्प आपल्या भाषणात म्हणाले. "हे शुल्क दोन्ही बाजूंनी सारखेच लागू केले जाईल. दरम्यान, शुर नवे दर १ एप्रिलऐवजी २ एप्रिललाच लागू करण्याचा निर्णय का घेतला? यावर ट्रम्प यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. "मला खरंतर हे नवे बदल १ एप्रिलपासूनच लागू करायचे होते. पण त्यामुळे माझ्यावर एप्रिल फूलचे आरोप व्हावेत, अशी माझी मुळीच इच्छा नव्हती.

### कॅनडावर 25 टक्के टेरिफ

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्कांवर टिप्पणी केली. "भारताकडून आपल्यावर ऑटो क्षेत्रात १०० टक्क्यांहून अधिक शुल्क आकारले जातात. दुसरीकडे अमेरिकेकडून चीनवर जेवढे टेरिफ दर लागू केले जातात, त्याच्या दुप्पट दर हे चीनकडून अमेरिकन उत्पादनांवर लागू केले जात आहेत.

---

# कंबख्तको यूपी भेज दो, इलाज हम करेंगे

## अबू आझमी यांनी केलेल्या विधानावरून योगी आदित्यनाथ संतापले

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबाबाबत केलेल्या एका विधानानंतर महाराष्ट्रात चांगलंच राजकारण तापलं आहे. 'औरंगजेब हा क्रूर प्रशासक नव्हता', असं आमदार अबू आझमी म्हटलं होतं. त्यांच्या या वक्तव्याचे महाराष्ट्राच्या विधानसभेत देखील पडसाद उमटले.**





एवढंच नव्हे तर विरोधकांनी विधानसभेच्या बाहेर आंदोलन करत अबू आझमी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती. अबू आझमी यांच्या विधानाचे पडसाद फक्त महाराष्ट्रातच नाही तर उत्तर प्रदेशमध्येही पाहायला मिळाले आहेत.उत्तर प्रदेशच्या विधानसभेत अबू आझमी यांच्या विधानावरून मोठा गदारोळ पाहायला मिळाला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अबू आझमी यांना चांगलंच सुनावलं आहे. "कंबख्तको उत्तर प्रदेश भेज दो, इलाज हम करेंगे", असं म्हणत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी योगी आदित्यनाथ यांनी समाजवादी पक्षावरही जोरदार टीका केली. समाजवादी पक्षाचे लोक औरंगजेबला आपला हिरो मानत असल्याचा हल्लाबोल योगी आदित्यनाथ यांनी केला. समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबाबाबत केलेल्या वक्तव्यावर बोलताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी म्हटलं की, "अबू आझमी यांना (समाजवादी) पक्षातून काढून उत्तर प्रदेशला पाठवा. आम्ही त्यांचा इलाज करू, समाजवादी पक्षाने एकीकडे महाकुंभमेळ्याला दोष दिला आणि आता देशातील मंदिरे उद्ध्वस्त करणाऱ्या औरंगजेब सारख्या व्यक्तीची प्रशंसा समाजवादी पक्षाच्या एका आमदाराकडून होते, तरीही समाजवादी पक्षाकडून त्या विधानाचा निषेध का केला जात नाही?", अशा शब्दांत योगी आदित्यनाथ यांनी टीका केली आहे.

### योगी आदित्यनाथ यांनी काय म्हटलं?

चुकीचा इतिहास दाखवला जात आहे. औरंगजेबाने अनेक मंदिरे बनवलेली आहेत. मी औरंगजेबाला क्रूर प्रशासक मानत नाही. तसेच छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेब यांच्यातील जी लढाई होती, ती लढाई राज्य कारभाराची होती. ती लढाई कुठेही हिंदू आणि मुस्लिमांची होती असं मी मानत नाही.

# पत्नीला पाहून खिलाडी अक्षय खळखळून हसला

अभिनेता अक्षय कुमारची पत्नी ट्विंकल खन्ना ही सोशल मीडियावर खूप ॲक्टीव असते. ट्विंकल आणि अक्षय हे त्यांच्या कुटुंबासह सुट्टीसाठी मालदीवला गेली आहे. जिथे ट्विंकलनं तिच्या संपूर्ण कुटुंबासोबत वाढदिवस देखील साजरा केला. ट्विंकलने आता एक व्हिडीओ शेअर केला आहे ज्यामध्ये मालदीवमध्ये तिच्यासोबत घडलेली एक मजेशीर घटना दिसत आहे. ट्विंकलनं या व्हिडीओला खास कॅप्शन देखील दिलं आहे. ट्विंकलनं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये संपूर्ण ट्रीपची खास झलक दाखवली आहे. या व्हिडीओच्या सुरुवातीला ट्विंकल सायकल चालवताना दिसते सायकलिंग करताना तिचा तोल जातो आणि ती एका खांबाला धडकते, असं या व्हिडीओमध्ये दिसत आहे. अशाताच पत्नीला खांबाला धडकताना पाहून अक्षय कुमार खळखळून हसतो. ट्विंकलनं इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या मालदीव ट्रीपच्या व्हिडीओला कॅप्शन दिलं, 'माझी सायकल खांबाला धडकण्या व्यतिरिक्त, ही ट्रीप मला खरोखरच स्वर्गात गेल्यासारखी वाटली. तुमच्याकडे नवीन वर्षासाठी कोणतेही मोठे संकल्प असतील तर ते खाली कमेंटमध्ये शेअर करुन इतरांना प्रेरणा द्या' ट्विंकलनं शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. ट्विंकलनं शेअर केलेल्या या व्हिडिओमध्ये तुम्हाला ट्विंकलच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनची झलकही पाहायला मिळेल. ज्यामध्ये ती केक कट करताना दिसत आहे.याशिवाय ट्विंकलनं तिथे तिच्या पुस्तकाची सक्सेस पार्टीही ठेवली.

# रिंकूनं दिलेल्या उत्तरांनी अनेकांचे लक्ष वेधले

अभिनेत्री रिंकू राजगुरू (RINKU RAJGURU) ही तिच्या अभिनयानं नेहमीच प्रेक्षकांची मनं जिंकते. सैराट चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या रिंकूनं प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केलं आहे. रिंकू ही सोशल मीडियावर ॲक्टिव असते. रिंकूनं इन्स्टाग्रामवर नेटकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं दिली आहे. रिंकूनं दिलेल्या उत्तरांनी अनेकांचे लक्ष वेधले आहे. 'तुझं टोपणनाव काय आहे?' असा प्रश्न एका नेटकऱ्यानं रिंकूला इन्स्टाग्रामवर विचारला. या प्रश्नाला रिंकूनं उत्तर दिलं, 'रिंकू' त्यानंतर आणखी एका नेटकऱ्यानं रिंकूला प्रश्न विचारला, 'रिंकू हे तुझं टोपणनाव आहे तर मग तुझं खरं नाव काय आहे?' या प्रश्नाचं रिंकूनं उत्तर दिलं, 'प्रेरणा' रिंकूचं खरं नाव प्रेरणा आहे, हे अनेकांना माहित नसेल. 'झिम्मा-2 नंतर कोणता नवा प्रोजेक्ट येणार?' असा प्रश्न देखील एका युझरनं रिंकूला विचारला. या प्रश्नाला तिनं उत्तर दिलं, 'लवकरच कळवते.' 2023 मधील तुझी सर्वात आवडती आठवण कोणती? असा प्रश्न एका नेटकऱ्यानं विचारला. या प्रश्नाचं रिंकूनं केदारनाथच्या मंदिराजवळील फोटो शेअर करुन उत्तर दिलं. रिंकूचा झिम्मा-2 हा चित्रपट काही महिन्यांपूर्वी रिलीज झाला. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. या चित्रपटात रिंकूसोबतच सुहास जोशी, निर्मिती सावंत,क्षिती जोग,सुचित्रा बांदेकर,सयाली संजीव आणि शिवानी सुर्वे या कलाकारांनी देखील प्रमुख भूमिका साकारली आहे.

# प्राजक्ता माळीचं हटके सेलिब्रेशन



अभिनेत्री प्राजक्ता माळी ही सोशल मीडियावर ॲक्टिव असते. प्राजक्ताच्या सोशल मीडियावरील पोस्ट नेटकऱ्यांचे लक्ष वेधतात. नुकताच प्राजक्तानं एक खास व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही तिच्या कुटुंबासोबत 31 डिसेंबरचं सेलिब्रेशन करताना दिसत आहे. प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये ती कुटुंबासोबत ॲनिमल या चित्रपटामधील 'जमाल कुडू' या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. प्राजक्तानं डोक्यावर एक ग्लास ठेवलेला दिसत आहे. तसेच प्राजक्तानं तिच्या कुटुंबासोबत 'मै हूं डॉन' या गाण्यावर देखील डान्स केला. व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही चुलीजवळ बसून भाकऱ्या थापताना देखील दिसत आहे. या व्हिडीओला प्रजक्तानं कॅप्शन दिलं, आमचे बॅबी देओलS आणि डॉनS... यात माझा 2023 चा शेवटचा सेल्फी आणि 2024 चा पहिला सेल्फी देखील आहे." प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव देखील केला आहे. एका नेटकऱ्यानं प्राजक्ताच्या व्हिडीओला कमेंट केली, "प्राजक्ता..खूपच भारी आहेस तू.कुटुंबाबरोबर जे तुझे क्षण असतात त्यांत तू खूप खुश, सुंदर दिसतेस. प्राजक्ता सर्व गुण संपन्न मुलगी." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "असेच क्षण जपायचे असतात प्राजक्ता आणि तू ते खुप भारी जपतेस THAT'S WE LOVE YOU . तू भाकरी करतानाचा पूर्ण व्हिडीओ टाक ना . मी मागे म्हटले होते ना की तु All ROUNDER आहेस तुला भाकरी करतांना पाहून ते सिद्ध झाले.

# 'खुर्ची' चा जबरदस्त ट्रेलर रिलीज

अभिनेता अक्षय वाघमारे (AKSHAY WAGHMARE) आणि राकेश बापट (RAQESH BAPAT) यांच्या 'खुर्ची' (KHURCHI) या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. या ट्रेलरमधील डायलॉग्सनं आणि कलाकारांच्या अभिनयानं प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. या ट्रेलरला नेटकऱ्यांची पसंती मिळत आहे. खुर्ची या चित्रपटाच्या ट्रेलरची सुरुवात "मी राजवीर राजाराम देसाई,एक दिवस खुर्ची आपलीच असणार" या डायलॉगनं होते. त्यानंतर ट्रेलरमध्ये अक्षय वाघमारेची एन्ट्री होते. ट्रेलरमध्ये अक्षयचा "पाहिजे, पाहिजे, भिती पाहिजे." हा डायलॉग ऐकू येतो. अक्षय हा खुर्ची या चित्रपटात सम्राट ही भूमिका साकारत आहे. 'खुर्ची' या बहुप्रतीक्षित चित्रपटात राकेश बापट, अक्षय वाघमारे, आर्यन हगवणे, प्रीतम कागणे, श्रेया पासलकर, महेश घाग, कल्याणी नंदकिशोर, सुरेश विश्वकर्मा हे कलाकार महत्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाच्या ट्रेलरवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. खुर्ची या चित्रपटाचा ट्रेलर लाँच इव्हेंट नुकताच पार पडला. या इव्हेंटला चित्रपटातील कलाकारांनी हजेरी लावली. तसेच अक्षय वाघमारेच्या पत्नीनं देखील या इव्हेंटला हजेरी लावली. 'खुर्ची' या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा शिव धर्मराज माने आणि संतोष कुसुम हगवणे यांनी सांभाळली आहे. हा चित्रपट 12 जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वी खुर्ची या चित्रपटाचा टीझर रिलीज झाला होता. या टीझरनं देखील अनेकांचे लक्ष वेधले होते. राजकारणाचे विविध रंग या चित्रपटात रेखाटण्यात आले आहेत. चित्रपटाची गाणी प्रशांत मडपुवर, सौरभ आणि सोमनाथ शिंदे यांनी लिहिली असून, त्यांना सन्मित वाघमारे, अभिषेक काटे यांनी संगीत दिले आहे. आदर्श शिंदे, अवधूत गुप्ते, अभय जोधपुरकर, रसिका वाखरकर, अमिता घुगरी आणि आर्यन यांनी या चित्रपटातील गाणी गायली आहेत. आता 'खुर्ची' या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.

# 'ओरी'ची पलकनं का मागितली माफी?

गेल्या काही दिवसांपासून ओरी (ORRY) म्हणजेच ओरहान अवत्रामणीहा सोशल मीडियावर चर्चेत आहे. अशी कोणतीही सेलिब्रिटींची पार्टी नाही, ज्यामध्ये ओरी गेला नाही. ओरी प्रत्येक पार्टीचे फोटो सोशल मीडियावर शेअर करतो. त्या फोटोमध्ये त्याच्यासोबत वेगवेगळे सेलिब्रिटी देखील असतात. अशातच आता हा सध्या ओरी पार्टीमुळे नाही तर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. अभिनेत्री पलक तिवारी (PALAK TIWARI) आणि ओरीचे व्हॉट्सॲप चॅट सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दोघांच्या या व्हॉट्सॲप चॅटनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. ओरी आणि पलक तिवारी यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हॉट्सॲप चॅटमध्ये पलक ही ओरीची माफी मागताना दिसत आहे. पलकनं ओरीला मेसेज केला, "ओरी, मी पलक बोलत आहे. मी तुझी माफी मागावी, असं तुला वाटत आहे का?" यावर ओरीनं इमोजी शेअर करुन रिप्लाय दिला. ओरीच्या मेसेजनंतर पलकनं रिप्लाय दिला, "मी साराच्या सन्मानार्थ बोलत आहे." यावर ओरीनं रिप्लाय दिला, 'एकतर तू स्वाभिमानाने माफी मागत आहेस कारण तुला कसं बोलावं कळत नाही' आता पलकनं ओरीची माफी का मागितली? हा प्रश्न नेटकऱ्यांना पडला आहे. ओरी आणि पलक तिवारी यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हॉट्सॲप चॅटमध्ये साराच्या नावाचा देखील उल्लेख आहे. ही सारा अली खान आहे, असा अंदाज नेटकरी लावत आहे. सारा अली खानचा भाऊ इब्राहिम अली खानला पलक डेट करत आहे, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर होत आहे. पलक आणि इब्राहिम या दोघांना अनेक वेळा एकत्र स्पॉट देखील करण्यात आलं आहे. द वर्जीन ट्री या चित्रपटामधून पलक प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात मौनी रॉय आणि संजय दत्त हे देखील महत्वाची भूमिका साकारणार आहेत. तिचा किसी का भाई किसी की जान हा चित्रपट गेल्या वर्षी रिलीज झाला. तसेच इब्राहिम हा सरजमीन या चित्रपटामधून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे, असंही म्हटलं जात आहे. गेल्या काही दिवसांपासून ओरी (ORRY) म्हणजेच ओरहान अवत्रामणी हा सोशल मीडियावर चर्चेत आहे. अशी कोणतीही सेलिब्रिटींची पार्टी नाही, ज्यामध्ये ओरी गेला नाही. ओरी प्रत्येक पार्टीचे फोटो सोशल मीडियावर शेअर करतो. त्या फोटोमध्ये त्याच्यासोबत वेगवेगळे सेलिब्रिटी देखील असतात. अशातच आता हा सध्या ओरी पार्टीमुळे नाही तर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. अभिनेत्री पलक तिवारीआणि ओरीचे व्हॉट्सॲप चॅट सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दोघांच्या या व्हॉट्सॲप चॅटनं अनेकांचे लक्ष वेधले आहेआणि पलक तिवारी यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या चॅटमध्ये पलक ही ओरीची माफी मागताना दिसत आहे.



# रचिनचा अजून एक विश्वविक्रम!

## ICC वनडे स्पर्धेत ‘ही’ कामगिरी करणारा जगातील पहिला खेळाडू

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयसीसी टूर्नामेंट आणि रचिन रवींद्रचे शतक यांचं जणू समीकरणचं झालं आहे. रचिन रवींद्रला आयसीसी स्पर्धेतील सामन्यांमध्ये शतक झळकावण्याची त्याला सवयच झाली आहे, असं त्याच्या रेकॉर्डवर दिसून येत आहे. न्यूझीलंडच्या या डावखुऱ्या फलंदाजाने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत शानदार शतक झळकावले. रचिनने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १०८ धावांची उत्कृष्ट खेळी केली. या शतकासह त्याने विश्वविक्रम आपल्या नावावर केला.**




रचिन रवींद्रने १०१ चेंडूत १३ चौकार आणि एका षटकारासह १०८ धावांची शानदार खेळी केली. यासह त्याने वनडेमध्ये हे पाचवे शतक केले आहे. ही सर्व शतकं त्याने आयसीसी स्पर्धेत केली आहेत. 5 शतके झळकावली आहेत आणि त्याने हा पराक्रम सर्वात कमी डावात केला आहे.रचिन रवींद्रने केवळ १३ डावात ५ शतकं झळकावली आहेत. मोठी गोष्ट म्हणजे त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीत केवळ पाच शतकं आहेत आणि ती सर्व त्याने विश्वचषक आणि चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये झळकावली आहेत. २०२३ च्या विश्वचषक स्पर्धेत त्याने ३ शतकं केली होती आणि आता या फलंदाजाने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये २ शतकं झळकावली आहेत.केवळ सचिन तेंडुलकर आणि रचिन रवींद्र यांनी वयाच्या ३०व्या वर्षापूर्वी आयसीसी वनडेमध्ये सर्वाधिक शतकं झळकावली आहेत. दोघांनी ५-५ शतकं केली आहेत. दक्षिण आफ्रिका वि. न्यूझीलंड उपांत्य फेरीच्या सामन्यात न्यूझीलंडने संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या उभारली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा उपांत्य सामना दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात लाहोरच्या मैदानावर खेळवला जात आहे. या सामन्याची नाणेफेक न्यूझीलंड संघाने जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि हा निर्णय अगदी योग्य असल्याचे सिद्ध करत ऐतिहासिक धावसंख्या उभारली आहे. मिचेल सँटनरच्या नेतृत्त्वाखालील संघाने उपांत्य फेरीत ६ बाद ३६२ धावा केल्या आहेत. यामध्ये सर्वात मोठं योगदान रचिन रविंद्र आणि केन विल्यमसन यांच्या १५० अधिक धावांच्या भागीदारीचे आहे. सलामीवीर रचिन रविंद्र आणि केन विल्यमसन या दोघांनीही आपआपली शतकं झळकावली आणि संघाला चांगल्या धावसंख्येचा पाया रचण्यात मदत केली.रचिन रवींद्रने आधी १०१ चेंडूत १३ चौकार आणि एका षटकारासह १०८ धावा केल्या आणि संघाला मोठ्या धावसंख्येचा पाया रचून दिला. तर यानंतर केन विल्यमसननेही त्याचे १५वे वनडे शतक झळकावले आहे. विल्यमसन ९४ चेंडूत १० चौकार आणि २ षटकारांसह १०२ धावा करत बाद झाला.

### भारत-न्यूझीलंड भिडणार

.चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या उपांत्य फेरीत न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा धावांनी दारूण पराभव करत अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. आता चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना भारत वि. न्यूझीलंड या संघांमध्ये होणार आहे. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील विक्रमी धावसंख्या उभारत दक्षिण आफ्रिकेच्या संघाला मोठं आव्हान दिलं होतं. पण सातत्याने विकेट्स गमावल्याने आफ्रिकेचा संघ मागे राहिला. पण दक्षिण आफ्रिकेकडून डेव्हिड मिलरने अखेरच्या चेंडूवर शतक पूर्ण करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. भारत वि. न्यूझीलंड यांच्यातील सामना दुबईत ९ मार्चला खेळवला जाणार आहे. भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाला उपांत्य फेरीत ४ विकेट्सने पराभूत करत आधीच अंतिम फेरीत स्थान मिळवले होते. तर आता न्यूझीलंडने आफ्रिकेला पराभूत करत फायनलचं तिकिट मिळवली.

---

# भारतीय संघाला दुबईत खेळण्याचा फायदा

## आम्हाला कुठल्याही प्रकारचा वेगळा फायदा होत नाही : गंभीर

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स करंडक २०२५ स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियावर मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. ९ मार्च रोजी या स्पर्धेचा अंतिम सामना खेळवला जाणार आहे. आज (६ मार्च) या स्पर्धेतील दुसरा उपांत्य सामना खेळवला जात असून न्यूझीलंडसमोर दक्षिण आफ्रिकेचं आव्हान आहे. या सामन्यात विजयी होणारा संघ अंतिम फेरीत भारताविरोधात मैदानात उतरेल. या स्पर्धेचं यजमानपद पाकिस्तानकडे आहे. मात्र, भारताने पाकिस्तानमध्ये जाऊन ही स्पर्धा खेळण्यास नकार दिल्यामुळे भारतीय संघाचे सामने दुबईत खेळवले जात आहेत.**




भारताने या स्पर्धेच्या अंतिम सामन्याचं तिकिट मिळवल्याने आता हा सामना दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. तर, इतर सर्व संघ पाकिस्तानमधील विविधी स्टेडियमवर आपापले सामने खेळत असून भारताविरुद्धच्या सामन्यासाठी त्यांना दुबईला जावं लागत आहे. यामुळे भारताव्यतिरिक्त इतर अनेक देशांचे माजी खेळाडू, क्रिकेट समालोचक, क्रिकेट समीक्षक स्पर्धेच्या आयोजनावर आक्षेप नोंदवत आहेत. दुसऱ्या बाजूला काही पाकिस्तानी क्रिकेटपटू, माजी क्रिकेटपटूंनी दावा केला आहे की भारतीय संघ दुबईच्या मैदानावर सगळे सामने खेळतोय, त्याचा त्यांना फायदा होत आहे. म्हणूनच ते या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पोहोचू शकले. दरम्यान, ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात भारताने विजय मिळवल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत भारतीय संघाचा प्रशिक्षक गौतम गंभीरला याबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर गंभीरने सडेतोड उत्तर दिलं.गौतम गंभीर म्हणाला, “भारतीय संघ दुबईच्या मैदानावर खेळतोय म्हणून आम्हाला कुठल्याही प्रकारचा वेगळा फायदा होत नाहीये. चॅम्पियन्स करंडक स्पर्धेसाठी आमचा संघ इथे आल्यानंतर आम्हाला या मैदानावर सराव करण्याची संधी देखील मिळाली नाही. मला कल्पना आहे की काहीजण वादविवाद करत आहेत की आम्हाला दुबईत खेळण्याचा फायदा होतोय. परंतु, मला कळत नाही की आम्हाला नेमका कसला फायदा होतोय?

### चार फिरकीपटू मैदानात उतरवले

स्पर्धेच्या दृष्टीकोनातून पाकिस्तानपासून जवळ आहे. इतर संघांसाठी हे मैदान जितकं नवीन आहे तितकंच ते आमच्यासाठी देखील आहे. मला तर आठवत देखील नाही की भारतीय संघ या मैदानावर शेवटची कोणती स्पर्धा खेळला होता.”आम्ही या मैदानावर एकही दिवस सराव केलेला नाही. आम्ही आयसीसीच्या क्रिकेट अकादमीमध्ये जाऊन सराव करतोय. इथल्या आणि तिथल्या परिस्थितीत १८० अंशांचा फरक आहे. काही लोकांना केवळ तक्रारीच करायच्या असतात. मला नाही वाटत की दुबईच्या मैदानावर खेळल्याचा आमच्या संघाला काही फायदा होत असेल. देखील दोन-दोन, तीन-तीन फिरकीपटू मैदानात उतरवले होते.भारताने या स्पर्धेच्या अंतिम सामन्याचं तिकीट मिळवल्याने आता हा सामना दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. तर, इतर सर्व संघ पाकिस्तानमधील विविधी स्टेडियमवर आपापले सामने खेळत असून भारताविरुद्धच्या सामन्यासाठी त्यांना दुबईला जावं लागत आहे. यामुळे भारताव्यतिरिक्त इतर अनेक देशांचे माजी खेळाडू, क्रिकेट समालोचक, क्रिकेट समीक्षक स्पर्धेच्या आयोजनावर आक्षेप नोंदवत आहेत. दुसऱ्या बाजूला काही पाकिस्तानी क्रिकेटपटू, माजी क्रिकेटपटूंनी दावा केला आहे की भारतीय संघ दुबईच्या मैदानावर सगळे सामने खेळतोय, त्याचा त्यांना फायदा होत आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरुवार ।

। दि. 6 मार्च 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## कमला शिक्षण संस्थेच्या प्रतिभा कनिष्ठ महाविद्यालयात

# मराठी दिन उत्साहात!

### शिक्षण विश्व : विविध स्पर्धा आणि विद्यार्थी कवी संमेलन रंगले

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलीत प्रतिभा कनिष्ठ महाविद्यालयात कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त “मराठी भाषा गौरव दिन “साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या भाषा विभाग प्रमुख प्रा .सुरेखा कुंभार यांनी भाषा विभागातील शिक्षकांच्या सहाय्याने याही वर्षी अनेकविध उपक्रमांचे आयोजन केले.**




यावेळी विविध स्पर्धांचे व विद्यार्थी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या कविता सादर केल्या. त्याबरोबरच मराठी भाषेला अभिजात भाषेचा जो गौरव प्राप्त झाला आहे त्याचे औचित्य साधत विद्यार्थ्यांनी माय मराठी भाषेचे महत्व सांगणारी भाषणे केली.त्याबरोबरच विद्यार्थ्यांना एकपात्री नाटकाची ओळख व माहिती व्हावी यासाठी अनेक कलाकार विद्यार्थ्यांनी एकपात्री नाटकांचे सादरीकरण करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी मराठीचा अभिमान म्हणून पारंपारिक वेशभूषा करून हा दिन उत्साहात साजरा केला. विद्यार्थ्यांनी कवी लेखक यांच्याविषयी महिती व मराठी साहित्याविषयी विविध भित्ती पत्रके तयार करून आणली होती. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कमला एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे संस्थापक, सचिव डॉ दीपक शहा तसेच उपप्राचार्या डॉ वनिता कुऱ्हाडे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंद उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन भाषा विभाग प्रमुख प्रा सुरेखा कुंभार यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्यार्थिनी वैदेही काशीकर हिने केले.

## ट्रेनर सुनील मिरचंदानी यांनी पब्लिक स्पिकिंगच्या सांगितल्या ‘10 टेक्निक’

### शिक्षण विश्व: निवेदन-सूत्रसंचालन कार्यशाळा उत्साहात

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**विद्यार्थी विकास मंडळ एमआयटी आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने निवेदन आणि सूत्रसंचालन कार्यशाळा उत्साहात झाली. ही कार्यशाळा आयोजित करण्यामागचा उद्देश्य म्हणजे महाविद्यालयातील सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन,सभा, चर्चासत्रे आणि परिषदांसाठी निवेदन कौशल्य विकसित करणे हा आहे.**



या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून रुचिका भोंडवे आणि ट्रेनर सुनील मिरचंदानी यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. पल्लवी महागावकर यांनी केले होते. कार्यशाळेत रुचिका भोंडवे यांनी निवेदन कसे करायचे, आवाजात चढ उतार कसा आणायचा, कार्यक्रमासाठी स्क्रिप्ट कशी लिहायची त्याचबरोबर निवेदनात असलेल्या नोकरीच्या संधी याची देखील माहिती दिली.

ट्रेनर सुनील मिरचंदानी यांनी पब्लिक स्पिकिंगच्या 10 टेक्निक सांगितल्या, स्टेजवर जाताना जी भीती वाटते त्यावर ती कशी मात करायची, तसेच त्यांनी कॉन्फिडंट वॉक मुलांकडून करवून घेतला.

प्रमाणपत्र वितरणाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तन्वी आणि सिद्धी या विद्यार्थिनींनी केले. या कार्यशाळेत एमआयटी कॉलेज सह पिंपरी चिंचवड मधील इतर महाविद्यालयातील एकूण 51 विद्यार्थी सहभागी झाले होते. ही कार्यशाळा महाविद्यालयाचे संचालक डॉ. वापरे आणि उपसंचालिका प्रा. अक्षदा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. तसेच या कार्यशाळेसाठी प्रा. मनीषा पाटील, डॉ. सुप्रिया लोंढे, डॉ. संदीप ढवळे, डॉ. प्रकाश राऊत, डॉ सुरेखा गायकवाड, प्रा वसंत करमाड या सदस्यांचे सहकार्य लाभले.


EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of
Excellence
in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!

# “एआय”च्या प्रगत अभ्यासक्रमांसाठी पुढाकाराची गरज

## शिक्षण विश्व: ‘होणहार भारत 2025 कॉन्क्लेव्ह’मधील तज्ज्ञांचा सुर

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानावर आधारित प्रगत अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठ आणि उद्योग क्षेत्रातील संशोधकांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे असे मत कुलपती डॉ. विजय डी पाटील यांनी व्यक्त केले.**



मावळ, आंबी येथील डॉ .डी वाय पाटील विद्यापीठाने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि तंत्रज्ञान नेतृत्वावर लक्ष केंद्रित करून तिसऱ्या ‘होणहार भारत 2025 कॉन्क्लेव्ह’चे आयोजन केले. सीएक्सओ कनेक्टच्या सहकार्याने ही परिषद आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाचा उद्देश हा एआयचे भविष्य आणि विविध क्षेत्रांवर त्याचा परिवर्तनीय परिणाम शोधण्यासाठी विचारवंत नेते, उद्योग तज्ज्ञ आणि व्यावसायिक यांच्याशी संवाद साधने हा होता. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानावर आधारित विद्यापीठ आणि उद्योग क्षेत्रातील संशोधकांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे असा सल्ला कुलपती डॉ. विजय डी पाटील यांनी दिला. या चर्चा सत्रात कुलगुरू प्रा. डॉ. सायली गणकर , रोकेट अँड सीएक्सओ कनेक्स्टचे संस्थापक आणि सीईओ नीलेश धनानी, एक्सएम एक्सलन्स प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक आणि सीईओ विनायक गपचुप, ईटीसीच्या टॅलेंट डेव्हलपमेंट संचालक प्रीती आहुजा, बिर्लासॉफ्टचे फायनान्स व्हाईस प्रेसीडेंट दयाश आगंळे, इन्व्होकएचआरचे सह-संस्थापक अपूर्व चौबे, एक्समॅटर्सचे संचालक अरपण सरकार, बिर्लासॉफ्टचे सीआयओ आणि आयटी प्रमुख आनंद कुमार सिन्हा आणि टेराब्लू क्लायमेट टेक्नॉलॉजीजचे संस्थापक आणि सीईओ प्रदीप मोटवानी यांचा समावेश होता. कार्यक्रमाची सुरुवात लॉ स्कूलच्या डॉ. रोहन दास यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यानंतर स्कूल ऑफ मॅनेजमेंटच्या इन्स्टिट्यूशनचे प्रमुख डॉ. प्रणव रंजन यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

### कौशल्य विकासाची तज्ज्ञांनी व्यक्त केली गरज

परिषदेने उद्योजकांना नवोन्मेष आणि तांत्रिक प्रगतीच्या वाढत्या गरजांबद्दल , उद्योगांना आकार देण्यात एआयची भूमिका आणि तंत्रज्ञान नेतृत्वाचे भविष्य , वेगाने विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पुढे राहण्यासाठी कौशल्य वाढवणे, सतत शिक्षण आणि विकासाचे महत्त्व उद्योग तज्ज्ञांनी अधोरेखित केले.विद्यापीठात एआयसीटीई संचालित इंजिनिअरिंग आणि मॅनेजमेंट अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला. चर्चा सत्रात दोन प्रमुख विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

